# शैक्षणिक गुणवत्तेबाबत आज वेबिनार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि कोपार्डे (ता. करवीर) येथील स. ब. खाडे महाविद्यालयातर्फे आज, शुक्रवारी आंतरराष्ट्रीय वेबिनार होणार आहे. 'अंडरस्टँडिंग फिलॉसॉफी ऑफ ?क्रिडिटेशन फ्रेम्वर्क'असा वेबिनारचा विषय आहे. सकाळी १० वाजता प्रभारी कुलगुरु डॉ. नितीन करमळकर, सांगरूळ शिक्षण संस्थेचे सचिव प्रा. जे. डी. आसगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत वेबिनारचे उद्घाटन होणार आहे.

## थोडक्यात महत्त्वाचे

# विद्यापीठातील शिवरायांच्या पुतळ्याच्या सुशोभिकरणाला प्रारंभ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याकडे विद्यापीठ प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने पुतळ्याची दुरावस्था झाली होती. याकडे युवा सेनेने आंदोलन करीत विद्यापीठ प्रशासनाचे लक्ष वेधले होते. याची दखल घेत विद्यापीठ प्रशासनाने तातडीने शिवरायांच्या पुतळ्याच्या सुशोभिकरणाला प्रारंभ केला आहे. युवा सेनेच्या मागणीची पुर्तता झाली आहे. आंदोलनाला यश आल्याने कार्यकर्त्यांतून समाधान व्यक्त होत असल्याचे युवासेना जिल्हाप्रमुख मंजीत माने यांनी सांगितले.

# 'गडहिंग्लजला शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र व्हावे'

गडहिंग्लज : ग्रामीण विद्यापीठ म्हणून ओळख असणाऱ्या कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र सांगली, सातारा या ठिकाणी सुरु होण्याची हालचाली सुरु आहेत. याच पार्श्वभुमीवर सीमाभागातील गडहिंग्लज, आजरा, चंदगड तालुक्यातील विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षणासाठी आणि मूलभूत संशोधनासाठी कोल्हापूरला जाणे आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्याने गडहिंग्लजला शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र सुरु करण्याची मागणी माजी नगरसेवक चंद्रकांत सावंत यांनी कुलपती भगतसिंग कोश्यारी यांच्याकडे पत्राव्दारे केली आहे. सदर पत्रामध्ये असे म्हटले की, गडहिंग्लज शहरात शासनाचे सर्व विभागाचे उपविभागीय कार्यालय आहेत. तसेच गोवा, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अनेक व्यवहार शहरात होत असल्याने सिंधुदुर्ग जिल्ह्याशी संपर्क चांगला आहे. यामुळे उच्चशिक्षणाच्या सोयीसाठी शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र सुरु करावे अशी मागणी केली आहे.


# सोलापूर विद्यापीठ अभ्यासक्रमात डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे पुस्तक



**प्रा. डॉ. व्ही. एन. शिंदे**

टेंबलाईवाडी ता. १६ : शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव व विज्ञान लेखक डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे 'एककांचे मानकरी' हे पुस्तक सोलापूरच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समाविष्ट झाले. एम. ए. मराठी या विषयामधील विज्ञान साहित्यविषयक अभ्यासक्रमात पुस्तकाचा यंदापासून पाठ्यपुस्तक म्हणून समावेश झाला.

एककांचे मानकरी या पुस्तकात एम. के. एस पद्धतीतील विविध एककांना शास्त्रज्ञांची नावे आहेत. अशा शास्त्रज्ञांचे जीवनकार्य रेखाटले आहे. दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेचा प्रतिष्ठेचा कृ. गो. सूर्यवंशी पुरस्कार, मिरजेच्या चैतन्य शब्दांगण संस्थेनेही या पुस्तकास पुरस्कार देऊन गौरविले आहे. असे घडले भारतीय वैज्ञानिक, 'हिरव्या बोटांचे किमयागार' आणि 'द्रव्यांची दुनिया' या पुस्तकांच्या माध्यमातून डॉ. शिंदे यांनी मराठी विज्ञान साहित्य क्षेत्रात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.




एककाचे मानकरी पुस्तक.